# प्रकरण पाचवे

# उपसंहार

आपला देश प्रामुख्याने खेडयांचा देश आहे. येथील संस्कृती ही कृषीप्रधान आहे. या अनुषंगाने खेडयातील जीवन समृध्द अशा लोकसाहित्यातून प्रगट झालेले आहे. लोककथा, लोकगीते आणि एकूणच लोकसाहित्य मराठी साहित्यामध्ये आपल्या वेगळ्या निर्मिती वैशिष्टयाने प्रभावी बनले आहे. लोक साहित्यातून प्रगट होणारे लोकजीवन हा अनेक अभ्यासकांच्या अभ्यासाचा विषय बनलेला आहे. लोकबोली ही प्रमाण बोलीला अधिक बळ देणारी आहे. देशीपणाच्या किंवा नागरी परंपरेच्या अनुषंगाने आज हा साहित्य प्रकार बहुचर्चित झालेला आहे. म्हणूनच कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमेवर असणा-या "निपाणी परिसरातील स्त्री गीतांचा अभ्यास" हा विषय प्रबंधिकेसाठी निवडला.

" निपाणी परिसरातील स्त्री गीतांचा अभ्यास" या प्रबंधिकेच्या अनुषंगाने 'लोकसाहित्य स्वरुप,' वैशिष्टये' अभ्यासण्याचा स्थूलपणे प्रयत्न पहिल्या प्रकरणांत केलेला आहे. यामध्ये एकविसाव्या शतकात पदार्पन करीत असताना भारतीय परंपरा, संस्कृतीचे सिंहावलोकन व्हावे म्हणून वेद, पुराणे, रामायण, महाभारत कालापासून लोकसाहित्याची जनगंगा मौखिक परंपरेने कशी अनंत पिढयातून संक्रमित होत आलेली आहे याचा थोडक्यात या प्रकरणात वेध घेतलेला आहे. मानवाच्या उत्पतीपासून त्याच्या कृती-उक्ती, 'स्व' अविष्कार यातून कलाकृती, शाब्द साहित्य यांची निर्मिती कसकशी होत गेली. जगातील लोकसाहित्य विशारदांचे लक्ष कसे वेधले, पाश्च्यात्यांचे आगमन नवीन विचार संस्कृतीचा अभ्यास यातून लोकपरंपरेचा, लोक संस्कृतीचा म्हणजेच पर्यायाने लोकसाहित्याचा अभ्यास होऊ लागला. यामध्ये ' लोक साहित्य' म्हणजे काय ? यातील 'लोक' आणि 'साहित्य' या शब्दांचे विशिष्ट अर्थ, यातून पौरात्य, पाश्च्यात लोकसाहित्य विशारदानी लोकसाहित्याच्या केलेल्या व्याख्या, मांडलेली मते, त्याचे व्यापकत्व, लोकवाङ:मय ही संकल्पना यातील शाब्द साहित्याची अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने केलेली मांडणी. यातील एक समृध्द दालन म्हणजे' लोकगीत' याचे वर्गीकरण, व्याख्या, उद्गम, विकास परंपरा, स्वरुप, व्याप्ती, वैशिष्टये, लोकगीतातील संख्येने विपूल असणारी स्त्रीगीते थोडक्यात त्याचे स्वरुप,

वैशिष्टये आणि एकूणच लोकसाहित्य लोकवाङ्मय-लोकगीते-स्त्री-गीते, स्वरूप वैशिष्टयांचा धावताआढावा 'लोकसाहित्य स्वरूप आणि वैशिष्टये' या पहिल्या प्रकरणात घेतलेला आहे. या प्रकरणाच्या बांधणीमध्ये आधार म्हणून १७ पुस्तकातील वेगवेगळे २७ संदर्भ घेतलेले आहेत. शिवाय इंग्रजी, हिंदी, संस्कृत मधील विषयानरूप विधाने घेतलेली आहे.

कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमेवरील निपाणी हे इतिहास प्रसिध्द गांव म्हणून दुस-या प्रकरणाच्या प्रारंभी निपाणीची वैशिष्टयपूर्ण ऐतिहासिक परंपरा, स्थान या निपाणी नगरीचा शेकडो वर्षांचा इतिहास महत्वाच्या पुराव्याच्या आधारे या परिसरातील स्त्री गीतांची पार्श्वभूमी, परंपरा लक्षात येण्यासाठी घेतलेला आहे. या निपाणी नगरीचे एककाळचे भूषण म्हणजे निपाणीकर देसाई सरकार, त्यांचा भूईकोट किल्ला, या घराण्यातील महत्वाकांक्षी, कर्तबगार सिध्दोजीराव देसाईचे पराक्रम शिवाय परिसरातील खेडयांच्या पारंपारिक जन-जीवनाचा शोध तसेच निपाणी परिसरातील समाजजीवन, श्रध्देची ठिकाणे, परि-सरातील भौगोलिक विशेष यांचा उल्लेख या गीतातून होतो. याच दुस-या प्रकरणामध्ये अभ्यासाच्या सोयीसाठी या परिसरातील स्त्रीगीतांचे तीन भागात वर्गीकरण केलेले आहे.

अ) <u>कौटुंबिक, नातेसंबंधाविषयीची स्त्रीगीते</u> -

१) मुलां विषयी

२) आई विषयी

३) भावा विषयी

४) बहिणी विषयी

५) नव-या विषयी

६) माहेर विषयी

७) सासर विषयी

८) स्त्री भावना विषयी

ब) सण समारंभ, परंपरा विषयक स्त्रीगीते -

१) सण

२) लग्नसमारंभ

३) परंपरा

४) मराठी भाविकांची पंढरी

५) पौराणिक परंपरा

क) श्रध्दा, अंधश्रध्दा व इतर स्त्रीगीते -

अंधश्रध्दा - नवस, दृष्ट लागणे, पायगुण, शकून, अपशकून.

श्रध्दा - परिसरातील देवदेवता विषयी अंबाबाई, यल्लमा, दस्तगीर...

इतर - कृषीकर्म, मनोरंजन, घडण(मैत्रिण) परस्त्री, शिवी, दुष्काळ, गांधीवध, इंग्रज जर्मन युध्द.

निपाणी परिसरातील स्त्री गीतांचे हे स्थूलपणे केलेले वर्गीकरण ही एकूण कुटूंब, परंपरा, समाजजीवन यांच्या अनुषंगाने व्यक्त होत असते. त्यामुळे त्या भावनेचे स्वरूप ब-याच वेळेला संमिश्र अशा स्वरूपाचे असते. अभ्यासाच्या सोयीसाठी असे वर्गीकरण करण्याचा प्रघात रूढ असला तरी स्त्री गीतांचा अभ्यास एकूण स्त्री जाणीवेच्या संदर्भातच करावा लागतो. देशाच्या परिस्थितीनुसार ही जाणीव प्रगट होत असते. या गीतांच्या अभ्यासाच्या कक्षा ही रुंदावत आहेत. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे क्षेत्र आज सर्वस्वी नवीन राहीलेले नाही. जुनी गीते काळाच्या उदरात गडप होण्याच्या मार्गावर असताना महाराष्ट्राच्या एका टोकाला असलेल्या सीमाभागातील कांही खेडयांतून जमविलेली ही गीते एकूणच लोकसाहित्याच्या अभ्यासात महत्वाची ठरतील असे वाटते. परिसरातील लोकगीते त्यातील पारंपारिकता, वैशिष्टये आणि काळाच्या अनुषंगाने त्यात कांही बदल झाले का ? याचा अभ्यास या दुस-या प्रकरणातील संकलित स्त्रीगीतांच्या आधारे केलेला आहे.

ज्या ज्या स्त्रियांनी गीते गायीली त्यांची रेकॉर्ड करून लिहून घेतली. तर ज्यानी बोलण्याच्या भाषेत लिहण्यास सांगीतली अशा सर्व गीतांचे संकलन परिसरातील स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी त्यांचे घरी भेटून ती संकलित केलेली आहेत. अशा स्त्रियांची ' संकलन केलेली गीते' या शिर्षकाखाली संदर्भानंतर नाव,

गाव, वय असे दिलेले आहे. अगदी १८ वर्षांच्या मुलींच्या टाळ्यांच्या गाण्यापासून ते ८५ वर्षांच्या स्त्रीच्या कौटुंबिक, भावनाविवश, पारंपारिक गीतापर्यंत त्या त्या वयोगटातील स्त्रियांनी आपल्या मौखिक स्मृतीचे प्रगटीकरण केलेले आहे. शिवाय यरनाळ, शिरगुप्पी, शिप्पूर, पांगीर, बुदलमुख, श्रीपेवाडी, नांगनूर, जत्राट, अक्कोळ, पडिलीहाळ, लखनापूर, ममदापूर, बिळ्ळव्हाळ, वाळकी, गव्हाणी, निपाणी अशा परिसरातील गावातील स्त्रियांनी आपल्या परिसर विशेषाची पारंपारिक गीते या गीतांचे संकलन दुसऱ्या प्रकरणात केलेले आहे.

प्रबंधिकेमधील ' निपाणी परिसरातील स्त्रीगीतांचा अभ्यास ' हे तिसरे प्रकरण होय. यात एकूण कुटूंब समाज नातेसंबंध या विषयीचे प्रारंभी चिंतन विवेचन केलेले आहे. तर दुसऱ्या प्रकरणातील तीन गटातील गीतांच्या अनुषंगाने क्रमाक्रमाने सलग विवेचन केलेले आहे. कौटुंबिक नाते संबंधातील अनेकविध नात्यातील स्त्री - भावना कशी, या गीतांच्या अनुषंगाने उलगडत गेली आहे. एकूण स्त्री भावना, सासर माहेरच्या आवर्तनात कल्पनेच्या भराऱ्या मारणारे स्त्रीमन आणि नात्याबद्दल असणारा अत्यंतिक जिव्हाळा याचे दर्शन मुलाचे कौतुक, आई-वडिलांविषयी असणारी गाढश्रध्दा, भाऊ-बहिणी विषयी दाट जिव्हाळा, नवऱ्या विषयीचा भितीयुक्त आदर तसेच सण-समारंभ, परंपरा विषयी वाटणारा मनोउल्हास यातून सण-उत्सव यामध्ये होणारे टाळ्याचे खेळ, दिवाळी, दसरा गौरी-गणपती या विषयीची रचना सांस्कृतिक परंपरेविषयी ओढ, मराठी भाविकांची पंढरी, पौराणीक परंपरेचा स्त्रीमनावर असलेला प्रभाव याचे गीतांच्या आधारे विवेचन शिवाय श्रध्दा, अंधश्रध्दा यातून स्त्रीच्या भाबुक श्रध्दाशील वृत्तीचे दर्शन घडते. परिसरातील देवदेवता विषयी असणारी श्रध्दा त्यातून संकट निवारणासाठी देवदेवताना नवस घालणे तसेच शकून, अपशकून, पायगुन, दृष्टीबाधा अशा अंधश्रध्देकडे अज्ञानामुळे असलेली ओढ या गीतांच्या अनुषंगाने दिसून येते. या प्रकरणाच्या अखेर भागात परिसरातील कृषीकर्म, मनोरंजन आणि स्त्रीचे थोडे परिघाबाहेरच्या विश्वाचे ज्ञान यामध्ये जसं मैत्रिण, परस्त्री, शिपी, तुळस यांचा उल्लेख येतो तसा थोडा व्यापक संदर्भ म्हणून गांधीवध, इंग्रजजर्मन युद्धाची जाणीव कांही गीतातून व्यक्त कशी झाली आहे. याचा परामर्श कांही गीतांच्या अनुषंगाने घेतलेली आहे.

' निपाणी परिसरातील स्त्री गीते - नवी जाणीव' या चवथ्या प्रकरणामध्ये १९६० नंतर बदलत्या समाजाचे, साहित्याचे, चळवळीचे भान लक्षात घेऊन एकूण बदलत्या विचार प्रवाहाच्या अनुषंगाने मराठी साहित्यात लोकसाहित्याचे स्थान, बदललेली खेडी, इ.स. १९७५ मध्ये जाहिर झालेले स्त्री मुक्तीचे दशक त्या दृष्टीने आलेले नवे विचार यातून या परिसरातील शोषीत स्त्रियाना मिळालेले बळ यातून हजारो स्त्री कामगारांचा प्रचंड मोठा एप्रिल १९७८ मध्ये झालेला लढा यामध्ये प्रा. सुभाष जोशी , प्रा. अच्युत माने यांचे न्याय्य मागणीसाठी ५ दिवसाचे उपोषण यातून स्त्रियांच्या स्वाभीमानाचा, आत्मभानाचा झालेला जन्म या पार्श्व-भूमीवर झालेली स्त्रियांची प्रचंड मोठी संघटना, युनियनची स्थापना या वास्तव घडामोडीचा आलेख या प्रकरणामध्ये काढलेला असून शोषणातून मुक्त झाल्यानंतर बदलेली जाणीव किंवा या खेडयातील स्त्रीला आलेले आत्मभान त्यामुळे बदललेली स्त्रीगीते कशा स्वरूपाची आहेत याचे थोडक्यात विवेचन केलेले आहे.

या परिसरातील स्त्री गीतांच्या अभ्यासातून स्त्री-जीवनाची आणि लोकजीवनाची जी कांही वैशिष्टये समोर आली ती निर्देशित करणे. माझया अभ्यासाच्या अनुषंगाने मला महत्वाचे वाटते. या गीतातील कौंटुबिक जिव्हाळा हा तसा सनातन विषय कोणताही प्रदेश असो या कौंटुबिक नातेसंबंध त्या त्या प्रदेशातील लोकगीतांची वैशिष्टये ते या प्रदेशातील स्त्री गीतातूनही जाणवतात या गीतात जसे मुलांचे, भावाचे अपरिमित कौतुक आहे. तसेच नव-या विषयी भितीयुक्त आदर आई विषयी गाढ श्रध्दा, माहेरची ओढ, माहेरच्या माण-सा विषयी आदर, आहे व मरण भाग्याचे मानले जाणे हीं लोक परंपरेतील वैशिष्टये या गीतातूनही स्पष्ट झालेली आहेत. ग्रामीण जीवनात सण समारंभाना एक सांस्कृतिक महत्व असते. ग्रामीण जीवनात अनेक प्रकारच्या रुढी प्रचलित असतात आणि या रुढी, परंपरा त्या प्रदेशातील लोकगीतांचा भाग बनलेल्या असतात. अशा रुढी परंपरा देवदेवता विषयीची श्रध्दा-भक्ती एवढेच नव्हे तर अंधश्रध्दांचे गीतातून झालेले समर्थन हे सर्व या लोकगीतातून जाणवते. याच प्रथा परंपरा संकेताच्या अनुषंगाने स्त्री मनाचा सहजपणे स्त्री गीतातून अविष्कार होत असतो. अनेक अशा

भावना असतात की ज्यातून स्त्री जीवनाच्या सुखदु:खाचे मनोज्ञ चित्रण होत असते. स्त्रीच्या शोषिकतेचा, तिच्या विशाल मनाचा करूणरम्य अविष्कार असेच या गीताचे स्वरूप असते. ही गीते लोकपरंपरेने चालत आलेली असली तरी उत्कटभावानुभव आणि जीवनानुभव व्यक्त करणारी असतात. भावनाविष्कार, विचार-सौंदर्य, कल्पनासौंदर्य आणि प्रतिमा इ. वाङ:मयीन गुणांचा आढळ अशा गीतातून होत असतो. या परिसरातील स्त्री गीतातून असे दर्शन घडते. ही स्त्री गीते संथ, हळूवार अल्हाददायक आहेत. साधी नि अनलंकृत आहेत. आपल्या सुखदु:खाच्या अनुषंगाने पौराणिक देवदेवता आणि व्यक्तिरेखा यांचे लौकिक पातळीवरील चित्रण गेयता आणि तालतत्त्व हे या गीतांचे वैशिष्टय आहे. श्रमपरिहारासाठी बरीच गीते गाईली जात असल्यामुळे गेयता या गीतामध्ये येणे अपरिहार्य आहे. या गीतातून परिसराची वैशिष्टये प्रगट होताना दिसतात.

निपाणी परिसरातील गीतांच्या विशेषामध्ये जाणवणारे एक वैशिष्टय म्हणजे कानडी मराठी भाषेचा संकर यातून निर्माण झालेले बोलीतील कांही नवीन शब्द मौखिक परंपरेने जरी स्त्री गीते चालत आलेली असली तरी वेगळ्या भाषेच्या संपर्काने बोलीत कसा बदल होतो आणि तो कांही काळात कसा त्या समाजजीवनात मान्यता पावतो याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. भाषा जरी मराठी असली तर कांही कानडी गांवाच्या संपर्कामुळे, कानडी सोयरे संबधामुळे मराठीत जेव्हा कांही कानडी जाणणा-या स्त्रिया गीते गातात, तेव्हा त्याच्या भाषेमध्ये पुरूषी विशेष जाणवतात. उदा:

" गल्लीन मी का <u>जातो</u> माझ्या पदराची सारासारी
नटवा बंधु माझा हुबा वकिल वाटवरी "

" वरणाचा योल जुंधळ्यावर गेला
बंधुची <u>केलो</u> लेक तिथ कळीचा पाया झाला.

" <u>यल्लमा</u>कारी <u>खंडाळ</u>भारी नाव काढुने तिच कुणी "

या गीतातून ' जातो ' , ' केलो ' असे पुरूषी बोल स्त्रियाच्या गीतात दिसून येतात. कानडीचा प्रभाव जसा परिसरातील स्त्रियांच्या बोलण्यात असतो

तसा गीतात सुध्दा असतो. 'खंबाळ', 'यल्लमा' असे कानडी शब्द मराठी गीतात जसेचे तसे येतात. स्त्री जीवनातील सुखदु:खे उत्कटपणे व्यक्त करण्याचे विलक्षण सामर्थ्य या गीतांतील शब्दात असते.

स्त्री जीवनाचे अनेक संदर्भ आणि अनुभव लाभलेले कांही विशिष्ट शब्द तर अर्थाच्या दृष्टीने अंत्यत लक्षणिय स्वरूपाचे आहेत. बया, माहन, गडणी, भ्रतार, रडाया, राजस, पुतळी, गरती, दुरडी, केळवण, न्हाण, अहेवपण असे कितीतरी शब्द फक्त स्त्री जीवनातच वापरले जातात. स्त्री-गीतातील प्रत्येकशब्द अनुभवातून आलेला असतो. अनुभव व्यक्त करीत असतो. त्यामुळे जीवनाविषयक अनेक संदर्भ या शब्दांना लाभलेले असतात. स्त्री-गीतांतील शब्द हळवे असतात. स्त्री मनातील भाव व्यक्त करण्याला साजेसे असेच आहेत.

स्त्री गीतांच्या या अभ्यासातून पारंपारिक स्त्रीगीतांचा जसा अभ्यास केलेला आहे. त्याच प्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरानंतर बदललेल्या स्त्री जीवनाचा जो आविष्कार याच स्त्री गीताच्या माध्यमातून झाला. त्याचाही परामर्श या अभ्यासामध्ये मला अभिप्रेत आहे. त्यामुळे निपाणी परिसरातील स्त्री गीतातून बदललेल्या नव्या जाणीवा किंवा भौतिक जीवनाचे बदलेले संदर्भ तपासण हे अभ्यासाच्या दृष्टीने अधिक महत्त्वपूर्ण आहे, असे मला वाटते. कारण १९६० नंतरच्या मराठी साहित्यात बदलाची जाणीव किंवा समाजातील वेगवेगळ्या स्तराना प्राप्त झालेले आत्मभान याचा विचार चळवळी आणि साहित्य यांच्या अनुषंगाने झाला. निपाणी परिसरातील शोषीत स्त्रियांची झालेली प्रचंड मोठी चळवळ ही संपूर्ण देशाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेणारी जशी ठरली त्याच प्रमाणे या चळवळीने स्त्रियांच्या भावविश्वात फार मोठी क्रांती घडवून आणली. त्यामुळेच या परिसरातील स्त्री गीते ही स्थितीशील जीवनाच्या वर्णनातून आपोआपच बाहेर पडली आणि नवेरूप, नवा आशय घेऊन प्रगट होऊ लागली. त्यामुळे ही स्त्री गीते एका विशिष्ट टप्प्यावर थांबलेली दिसून येत नाहीत. तर बदलत्या जीवनाची साक्षीदार ठरतात. व्यक्तिगत आणि सामुहिक रूपाने प्रगट होत असताना या गीतानी जो नवेपणा आणला त्याचे एकूणच मराठी स्त्री गीतांच्या संदर्भात वेगळेपण आहे. आणि त्या वेगळेपणाची चिकित्सा ही देखिल या प्रबंधिकेमध्ये मी केलेली आहे.

## संदर्भ सूची


१) कर्वे चि. ग. : लोकसाहित्यमाला पुष्प पहिले

२) श्री. चंद्रप्रभु तीर्थ निपाणी शत-सवंत्सरी स्मृतिग्रंथ-१९९२.

३) डॉ. जोशी वसंत, अदवंत म. ना. (संपा.) : भाषा साहित्य संशोधन खंड तिसरा प्रथमावृत्ती, १९८९

४) डॉ. तावरे स्नेहल, प्रा. दातार आरती (संपा.) : साहित्याने मला काय दिले ? प्रथमावृ-त्ती, १९९०.

५) निपाणी नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृति ग्रंथ, १९५५.

६) नांदापूरकर ना. गो. : मराठीचा मोहर

७) डॉ. देशपांडे कमलाबाई : अपौरुषेय वाङ:मय

८) पांडे त्रिलोचन : लोकसाहित्य का अध्ययन

९) पं. व्दिवेदी : भारतीय लोकसाहित्य

१०) डॉ. बाबर सरोजिनी : मराठीतील स्त्रीधन प्रथमावृ-त्ती, १९५६.

११) डॉ. बाबर सरोजिनी (संपादक) : लोकसाहित्य साजशिणगार, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्यमला, पुष्प ११ वे.

१२) डॉ. बाबर सरोजिनी (संपा.) : लोकसाहित्य भाषा आणि संस्कृती

१३) डॉ. भवाळकर तारा : लोकसंचित प्रथमावृ-ती १९९६

१४) डॉ. भवाळकर तारा : लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा, प्रथमावृ-ती, १९९०

१५) भागवत दुर्गा : लोकसाहित्याची रूपरेखा आवृ-ती, १९५६

१६) भावे निलीमा : स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा, आवृ-ती, १९८९.

१७) मराठी समाजशास्त्र परिषद ७ वे अधिवेशन, अर्जुननगर, १९९१ (अभ्यासपूर्ण लेख संग्रह)

१८) डॉ. मांडे प्रभाकर : लोकसाहित्याचे स्वरूप.

१९) डॉ. मांडे प्रभाकर : लोकसाहित्याचे अंत:प्रवाह पहिली आवृ-ती १९७५

२०) मेहता मराठी ग्रंथ जगत : दिवाळी अंक, १९९७

२१) महाराष्ट्र टाइम्स रविवार १६ डिसेंबर, १९९०

२२) महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक २७७ एप्रिल-जून, १९९६.

२३) डॉ. मोरजे गंगाधर : लोकसाहित्य एक स्वतंत्र अभ्यास क्षेत्र दुसरी आवृ-ती, १९९३.

२४) डॉ. मोरजे गंगाधर : लोकसाहित्य बदलते संदर्भ बदलती रूप प्रथमावृ-ती, १९९७.

२५) डॉ. मोरजे गंगाधर : लोकसाहित्य आकलन आणि आस्वाद १९९३ राखीव

२६) डॉ. व्यवहारे शरद : मराठी स्त्रीगीते प्रथमावृ-त्ती, १९९१

२७) डॉ. व्यवहारे शरद : लोकवाङ:मय रूप-स्वरूप
प्रथमावृ-त्ती सप्टेंबर, १९९१

२८) सहस्त्रबुध्दे अनिल : लोकसाहित्य संशोधन पध्दती
प्रथमावृ-त्ती, १९९७.

२९) संत इंदिरा : मालनगाथा, प्रथमावृ-त्ती, १९९६

३०) साने गुरुजी : स्त्री जीवन प्रस्तावना रा. चि. ढेरे.

३१) शेंडि ना. रा. : लोकसाहित्य संपदा.

३२) सांस्कृत्यायन राहुल, डॉ. उपाध्याय कृष्णदेव : हिंदी साहित्य का बृहत इतिहास षोडश भाग-हिंदी का लोकसाहित्य.

३३) सावदेकर आशा (संपा.): आजचे मराठी साहित्य
डॉ. वि.भा. प्रभुदेसाई गौरवग्रंथ,
प्रथमावृ-त्ती, १९९५.